वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
संत तुकाराम नगर पोलीस ठाणे,
स्वराज्य चौक, संत तुकाराम नगर, पिंपरी पुणे. १८
☏ ०२० -२७४२००८० ✉ psstnagar-pcpc@mah.gov.in

जावक क्रमांक/ ee /२०२५, पिंपरी चिंचवड                दिनांक ०७/०२/२०२५

# प्रेस नोट

**पिंपरी चिंचवड महानरपालिकेकडुन विविध उपक्रमाअंतर्गत बसविण्यात आलेल्या सार्वजनिक ठिकाणच्या सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यांचे यु.पी.एस. व बॅटरीज् चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगार आरोपीस संत तुकारामनगर पोलीस ठाणे "तपास पथक"कडुन अटक.**

**आरोपींचे ताब्यातुन एकुण १७ बॅटरीज् व २१ यु.पी.एस. ०१ होंडा ॲक्टीवा दुचाकी असा एकुण ५,९८,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन तीन दाखल गुन्हे उघडकीस आणलेबाबत**

पिंपरी चिचंवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत वाहन चोरी व इतर चोरी करणारे गुन्हेगारांवर कारवाई करणेबाबत मा. श्री.विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, श्री डॉ.शशिकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, श्री वसंत परदेशी, अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड मा. स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ – १, मा. सचिन हिरे, सहा.पोलीस आयुक्त पिंपरी विभाग, यांनी आदेशीत केले आहे. त्या अनुसार रेकॉर्डवरील व सक्रिय असलेल्या गुन्हेगारांवर कारवाई करण्याची मोहीम सुरू केली आहे.

दिनांक ०५/०२/२०२५ रोजी पिंपरी तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक श्री. शाकिर जिनेडी यांचे पथक आमचे मार्गदर्शनाखाली रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करीत असतांना तपास पथकातील पोलीस अंमलदार जावेद मुजावर ब.नं. १८८० यांना गोपनिय बातमीदार यांचे मार्फतिने बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार बुध्दभुषण प्रविण डोंगरे रा. घरकुल चिखली पुणे. याने पिंपरी चिंचवड परिसरात सार्वजनिक ठिकाणी बसविलेल्या सी.सी.टी.व्ही यंत्रणेचे साहित्य चोरी करुन लपवून ठेवले आहे. तसेच काही साहित्य विक्रीसाठी बी.आर.टी.रोड, चिंचवड एम.आय.डी.सी. येथे येणार आहे वगैरे खबर मिळाल्याने बातमी प्रमाणे संत तुकारामनगर पोलीस ठाणे तपास पथकाकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी सापळा रचुन बातमी प्रमाणे एक इसम चिंचवड एम.आय.डी.सी मधील काला ग्रुप कंपनीचे पाठीमागील सध्या बंद असलेल्या बी.आर.टी. रोडवर बस स्टॉप जवळ होंडा ॲक्टीवा दुचाकीवर उभा राहुन कोणाची तरी वाट पाहत असल्याबाबत खात्री झाल्याने तपास पथकाने शिताफिने सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव वरील प्रमाणे असल्याचे सांगुन त्याचेकडील मालाबाबत विचारणा करता त्याने प्रथम उडवा उडवीची उत्तरे दिली. त्याचे ताब्यातील साहित्याची तपासणी करता ०२ युपीएस व ०४ एक्साइड कंपनीच्या बॅटरी मिळुन आल्या त्यांस ताब्यात घेवून जप्त मालाची पडताळणी करता ०२ युपीएस संत तुकारामनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ४१/२०२५, भा.न्या.सं.कलम

३०३(२) यातील असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करुन रिमांड मुदतीत अधिक तपास करता त्याचेकडुन खालील वर्णनाचा माल जप्त करण्यात आला आहे.

१) १३,६००/- रुपये किंमतीच्या ०४ नग एक्साइड कंपनीच्या काळया रंगाच्या त्यावर लाल रंगाचे स्टिकरमध्ये पॉवर सेफ प्लस मॉडेल व सिल्ड लिड ॲसिड बॅटरी १२ व्ही असे इंग्रजीत लिहीलेल्या जुवाकिअं
२) ४५,८००/- रुपये किंमतीचे ०२ नग फुजी इलेक्ट्रीक कंपनीचे दोन नग ३ के.व्ही. क्षमतेचे यु.पी.एस. काळया रंगाचे जुवाकिअं.
३) ६०,०००/- रुपये किंमतीची होंडा ॲक्टीवा गाडी काळया रंगाची तिचा नोंदणी क्रमांक एम एच १४ के.पी. १८८४ असा असलेली जुवाकिंअ.
४) ३,४३,५००/-रुपये किंमतीचे EATON कंपनीचे काळया रंगाचे १५ नग यु.पी.एस.जु.वा.किं.अं.
५) ४५,८००/- रुपये किंमतीचे NUMERIC कंपनीचे काळया रंगाचे ०२ नग यु.पी.एस.जु.वा.किं.अं.
६) ४५,८००/- रुपये किंमतीचे FUJI कंपनीचे काळया रंगाचे ०२ नग यु.पी.एस.जु.वा.किं.अं.
७) ४४,२००/- रुपये किंमतीचे EXIDE कंपनीच्या काळया रंगाच्या १३ नग बॅटरी जु.वा.किं.अं.

-----------

एकुण ५,९८,७००/- रुपये

सदर बाबत संत तुकारामनगर पोलीस ठाणे, एम.आय.डी.सी. भोसरी पोलीस ठाणे, काळेवाडी पोलीस ठाणे येथे प्रत्येकी एक गुन्हा उघडकीस आणला असुन अजुन काही फिर्यादी दाखल होण्याची शक्यता आहे.

---ooo---

सदर कामगिरी मा.श्री. विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा.डॉ.शशीकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त पिंपरी चिंचवड, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड, मा. श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त सो परिमंडळ १ पिंपरी चिंचवड, मा. श्री सचिन हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो. पिंपरी विभाग पिंपरी चिंचवड, यांचे मार्गदर्शनाखाली गोरख कुंभार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संत तुकारामनगर पोलीस ठाणे, तपास पथकातील पो.उप निरीक्षक शाकिर जिनेडी, सहा.पोउपनि दिपक महाजन, पो.हवा. ७९७ स्वप्निल वारडे, पो.हवा.३१९७ संतोष रजपुत, पो.ना.१८८० जावेद मुजावर, पो.शि.२५३३ भागवत गायकवाड, पोशि.२९७३ अनिल वाघ यांनी केली आहे.

संत तुकाराम नगर पोलीस ठाणे पिंपरी चिंचवड सत्यमेव जयते

(गोरख कुंभार)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
संत तुकारामनगर पोलीस ठाणे
पिंपरी चिंचवड